**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ओमानमध्ये दाखल, संरक्षण आणि धोरणात्मक भागिदारी बळकट करण्यावर चर्चा सुरू

- विमा क्षेत्रातली थेट परकीय गुंतवणूक वाढवणाऱ्या विधेयकाला संसदेची मंजुरी, रोजगार हमी संदर्भातल्या विधेयकावर लोकसभेत चर्चा सुरू

- जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत उमेदवारी अर्जावर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचा निर्णय अंतिम, राज्य मंत्रीमंडळाचा निर्णय

- खासगी क्षेत्रातल्या कर्मचाऱ्यांना एनपीएसमधून ८० टक्क्यांपर्यंत रक्कम काढता येणार, एनपीएसमधल्या रकमेवर कर्जही मिळणार

**आणि**

- भारत आणि दक्षिण आफ्रिकेतल्या चौथ्या टी-ट्वेंटी सामन्यावर धुक्याचं सावट

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज ओमानमधे मस्कत इथं पोचले. विमानतळावर ओमानचे उपप्रधानमंत्री सय्यद शिहाब बिन तारिक अल सईद यांनी त्यांचं स्वागत केलं. प्रधानमंत्री मोदी आणि ओमाने उपप्रधानमंत्री सईद यांच्यात सध्या चर्चा सुरू आहे. भारत आणि ओमान यांच्यातलं संरक्षण क्षेत्रातलं सहकार्य बळकट करणं आणि धोरणात्मक भागीदारी पुढे नेण्यावर या चर्चेचा भर आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज इथियोपियाच्या संसदेच्या संयुक्त सत्राला संबोधित केलं. जगात शांतता प्रस्थापित करण्यासाठी भारत आणि इथियोपिया एका कुटुंबाचा भाग म्हणून काम करत आहेत, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. जागतिक पातळीवर ग्लोबल साऊथचं महत्त्व त्यांनी अधोरेखित केलं.

***होल्ड... प्रधानमंत्री नरेंद्र मोदी***

भारत आणि ओमान यांच्यातले संबंध प्राचीन काळापासूनचे असून आपल्या कार्यकाळात ते आणखी बळकट झाल्याचं मोदी म्हणाले. जागतिक पातळीवरील दूरदर्शी नेतृत्व आणि भारत-इथियोपिया भागीदारी बळकट करण्यात लक्षणीय योगदान दिल्याबद्दल मोदी यांना काल इथियोपियाचे प्रधानमंत्री डॉ. अबी अहमद अली यांच्या हस्ते, 'द ग्रेट ऑनर निशान ऑफ इथियोपिया' या सन्मानानं गौरवण्यात आलं.

**<><><><><>**

अणुऊर्जेचा शाश्वत वापर आणि प्रगती विधेयक आज लोकसभेत मंजूर झालं. या क्षेत्रात सुरक्षा, दर्जा आणि आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठीच्या यंत्रणा बळकट करण्याचं काम हे विधेयक करेल, असा विश्वास अणुऊर्जा राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी विधेयकावरच्या चर्चेला उत्तर देताना व्यक्त केला. या क्षेत्रातल्या खासगी कंपन्यांना सरकार जास्त अधिकार आणि स्वातंत्र्य देत असल्याचंही त्यांनी सांगितलं.

***होल्ड... बाईट- जितेंद्र सिंह***

अणुऊर्जेसारख्या क्षेत्राची दारं खासगी कंपन्यांसाठी उघडण्याचे तोटे अधोरेखित करून काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, द्रमुक इत्यादी पक्षांनी या विधेयकाला विरोध केला. हे विधेयक मंजूर झाल्यानंतर विरोधकांनी सभात्याग केला.

सध्या विकसित भारत- रोजगार आणि आजिविका हमी योजना ग्रामीण विधेयकावर लोकसभेत चर्चा सुरू आहे.

**<><><><><>**

विमा क्षेत्रात थेट परदेशी गुंतवणूक सध्याच्या ७४ टक्क्यावरून १०० टक्क्यावर नेणारं, सबका बिमा, सबकी रक्षा विधेयक राज्यसभेनं आज संमत केलं. या विधेयकात विरोधकांनी सुचवलेल्या अनेक सुधारणा सभागृहानं नामंजूर केल्या.

या विधेयकामुळे परदेशी कंपन्यांना विमा क्षेत्रात अधिकाधिक भांडवल आणता येईल, तसंच अधिकाधिक नागरिकांना विमा संरक्षण मिळेल, असा विश्वास या विधेयकावरच्या चर्चेला उत्तर देताना अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी व्यक्त केला. अधिकाधिक कंपन्या या क्षेत्रात आल्यामुळे स्पर्धा वाढेल आणि विम्याचा हप्ता कमी होईल, तसंच रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होतील, असा अंदाजही त्यांनी व्यक्त केला.

निरस्तीकरण आणि दुरुस्ती विधेयक २०२५ही आज राज्यसभेत चर्चेनंतर मंजूर झालं. लोकसभेनं हे विधेयक कालच मंजूर केलं होतं. एकंदर ७१ कायदे रद्द करण्याची आणि ४ कायद्यांमध्ये सुधारणा करायची तरतूद या विधेयकात आहे.

**<><><><><>**

आकाशवाणी आणि दूरदर्शननं तयार केलेले कार्यक्रम, राष्ट्रीय आणि स्थानिक आशय, तसंच शासकीय कार्यक्रम, सण-उत्सव, क्रीडा क्षेत्रांतल्या कार्यक्रमांचं थेट प्रक्षेपण इत्यादीतून अर्थार्जन करण्यासाठी एका समावेशक धोरणाचा मसुदा सरकारनं तयार केला आहे. माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉक्टर एल. मुरुगन यांनी आज लोकसभेत लेखी उत्तरात ही माहिती दिली. प्रसार भारतीच्या ओटीटी मंचावर प्रदर्शित होणाऱ्या आशयाचाही यात समावेश आहे.

तसंच, आकाशवाणी आणि दूरदर्शनची कार्यक्षमता आणि प्रेक्षकवर्ग विस्तारण्यासाठी सरकार महत्त्वाची पावलं उचलत असल्याचंही डॉक्टर मुरुगन यांनी आणखी एका लेखी उत्तरात सांगितलं.

**<><><><><>**

विकसित भारत- रोजगार आणि आजीविका हमी योजना ग्रामीण विधेयकावर संसदेत चर्चा सुरू आहे. या विधेयकातल्या तरतुदींविषयी नाशिक जिल्ह्यातले मंगेश गाडे यांनी आकाशवाणीकडे प्रतिक्रिया व्यक्त केली.

**होल्ड बाईट मंगेश गाडे**

**<><><><><>**

जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत उमेदवारी अर्जाबाबत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचा निर्णय अंतिम ठरवण्यासाठी निवडणूक कायद्यात सुधारणा करायचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. आज मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत, निवडणूक अधिनियम १९६१ मध्ये सुधारणा करणारा अध्यादेश काढायला मान्यता देण्यात आली.

महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियमातल्या तरतुदीनुसार उमेदवारी अर्ज स्वीकारणाऱ्या किंवा स्वीकारायला नकार देणाऱ्या निवडणूक अधिकाऱ्याच्या निर्णयाविरुद्ध जिल्हा न्यायालयात याचिका दाखल करता येते. मात्र विविध जिल्हा न्यायालयांमध्ये वेगवेगळ्या कालावधीसाठी अशा अनेक याचिका प्रलंबित राहत असल्यानं निवडणुका कालबद्धरित्या घेणं शक्य होत नसल्यानं, या तरतुदी वगळण्याबाबतचा प्रस्ताव राज्य निवडणूक आयोगानं शासनाला पाठवला आहे. त्यानुसार हा निर्णय घेतल्याचं राज्य शासनाच्या प्रसिद्धिपत्रकात म्हटलं आहे.

**<><><><><>**

सदनिका घोटाळा प्रकरणी राज्याचे क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांच्याविरुद्ध नाशिक जिल्हा आणि सत्र न्यायालयानं आज अटक वॉरंट जारी केलं. कोकाटे रुग्णालयात दाखल असल्यानं अटक पुढे ढकलण्याची विनंती करणारा अर्ज त्यांच्या वकिलांनी केला होता. मात्र न्यायालयानं हा अर्ज फेटाळून लावला, तसंच काल या प्रकरणाच्या अंतिम सुनावणीला गैरहजर राहिल्याबद्दल कोकाटे यांच्यावर ताशेरे ओढले.

नाशिक जिल्हा न्यायालयाच्या निर्णयाला कोकाटे यांनी मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिलं. या प्रकरणाची तातडीनं सुनावणी घ्यावी, अशी मागणी

त्यांच्या वकिलांनी न्यायमूर्ती आर. एन. लद्ढा यांच्या पीठाकडे केली, मात्र न्यायालयानं या प्रकरणाची सुनावणी शुक्रवारी ठेवली आहे.

<><><><><>

गैरसरकारी आणि खासगी क्षेत्रातल्या कर्मचाऱ्यांना आता निवृत्तीनंतर एनपीएसमधून ६० ऐवजी ८० टक्क्यांपर्यंतची रक्कम काढून घेता येईल. उर्वरित २० टक्के रक्कम ॲन्युईटी योजनेत गुंतवावी लागेल. यासंदर्भातले नियम पीएफआरडीए अर्थात पेन्शन फंड नियामक आणि विकास प्राधिकरणानं जारी केले आहेत. एनपीएस खात्यात जमा असलेली रक्कम ८ लाख रुपयांपेक्षा कमी असेल तर खातेधारकांना एकरकमी किंवा टप्प्याटप्प्याने पूर्ण रक्कम काढून घेता येईल. नव्या नियमांनुसार एनपीएस खात्यातल्या रकमेच्या बदल्यात वित्तीय संस्थांकडून कर्ज काढता येईल. PFRDA नं सरकारी कर्मचाऱ्यांसाठी एनपीएसमधून बाहेर पडण्याचं कमाल वय आता ७० वरुन वाढवून ८५ केलं आहे.

<><><><><>

म्युच्युअल फंडाच्या नियमावलीत सुधारणा आणि देखभाल शुल्क, मध्यस्थ शुल्कावर मर्यादा आणणाऱ्या सुधारणा सेबीनं आज जाहीर केल्या. नव्या आर्थिक वर्षापासून हे नियम लागू होतील. याशिवाय शेअर ब्रोकरच्या नियमावलीत सुधारणाही सेबीच्या संचालक मंडळानं मंजूर केल्याचं सेबीचे अध्यक्ष तुहीन कांत पांडे यांनी आज जाहीर केलं. आयपीओ संदर्भातल्या सुधारणा, तसंच सेबीच्या अधिकारी आणि संचालक मंडळासाठी सुधारित नियमावलीला सुद्धा संचालक मंडळानं मान्यता दिली.

<><><><><>

छत्तीसगडमधे नारायणपूर जिल्ह्यात आज ११ माओवाद्यांनी पोलिसांपुढं आत्मसमर्पण केलं. त्यात पाच महिलांचा समावेश आहे. या सर्वांवर मिळून ३७

लाख रुपयांचं बक्षीस होतं. छत्तीसगड सरकारच्या पुनर्वसन धोरणानुसार या सर्वांना प्रोत्साहनपर प्रत्येकी ५० हजार रुपयांचे धनादेश देण्यात आले.

**<><><><><>**

भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका चौथा टी-२० सामन्यावर धुक्याचं सावट आहे. लखनौ इथल्या मैदानावर ७ वाजता सामन्याला सुरुवात होणार होती, मात्र दाट धुक्यामुळे नाणेफेक अद्याप झालेली नाही. साडे ७ आणि ८ वाजता धुक्याची पाहणी झाली पण परिस्थिती खेळण्यासारखी नसल्यानं. आता पुन्हा साडे ८ वाजता धुक्याची पाहणी होईल. सध्या या मालिकेत २-१नं आघाडीवर असलेला भारत आजचा सामना जिंकून मालिकाही खिशात घालण्य़ाच्या प्रयत्नात आहे. मालिकेतला पाचवा आणि शेवटचा सामना शुक्रवारी अहमदाबाद इथं होणार आहे.

**//<><><><><>//**